कोल्हापूर TIMES OF INDIA
महाराष्ट्र टाइम्स
शनिवार, १ जुलै २०१७

# सॅटर्डे फीचर्स



शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याभोवतालची सुंदर बाग आणि हिरवा गालीचा पाहणाऱ्याला नेहमीच सुखद अनुभूती देतो. पावसाळ्यात तर या परिसराचे सौंदर्य अधिकच खुलून येते. नुकताच पाऊस पडून गेल्यानंतर या हिरवाईचे छायाचित्र टिपले आहे अमित गद्रे यांनी.

१ .JUN २०१७ Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# University to charge students for lead college activities

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has asked its affiliated colleges to charge a minor fee ranging from Rs 25 to Rs 100 from the students enrolled in the academic year 2017-18.

The colleges have to deposit the total amount collected through this initiative to the university. The university will later return 90% of the total amount to the lead colleges, to initiate better activities during the academic year.

It has asked the respective colleges to collect Rs 25 from arts, science and commerce students, Rs 50 from law, education, physical education and management students and Rs 100 from engineering, pharmacy and technology students.

D T Shirke, acting pro vice-chancellor of SUK said, "The college is expected to lead the process for quality management for the cluster. The primary function of a lead college is to collect and update information regarding higher education. Changes in the field of science, technology, research and recent policies will need to be tracked."

The amount collected is returned to the colleges to organise various activities, be it a personality development lecture, an awareness campaign on sexual harassment or expert lectures on competitive exams.

Shirke added that since it is a nominal amount, the collected money will be negligible. "We might increase the fee in future, to organise better activities," he said.

The official further added that information regarding various grants offered by the University Grants Commission (UGC) and other such funding agencies will be provided by the lead college.

The lead college will also have to impart the re-accreditation process, e-content and e-learning facilities should also be imparted to its cluster of colleges.

An official said the most important agenda for the lead colleges is to strengthen the placement cell with an officer. The colleges in a cluster can obtain proper guidance in this regard from its lead college.

The SUK has around 20 lead colleges across Satara, Sangli and Kolhapur districts.

TOI



Colleges have to deposit the collected amount with the university

## AT A GLANCE

**Fees charged for 2017-18 academic year**

- Arts, science and commerce college: ₹25
- Law, education, physical education & management Institutions: ₹50
- Engineering, pharmacy & technology colleges: ₹100

**What is a lead college?**

- Expected to lead the entire process of total quality management of the cluster
- Primary function is to collect and update all sorts of information regarding higher education
- A lead college also has to keep an eye on changes in the fields of science and technology, research and recent policies

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि. 1 JUL २०११
पुढारी

# सिनियर वर्गाची प्रवेश प्रक्रिया सुरु

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठांतर्गत घेण्यात आलेल्या परिक्षांचे निकाल जाहीर होत आहेत. यानुसार सिनियर कॉलेजमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. एस.वाय. बी. एस्सी आदी अभ्यासक्रमांचे निकाल अद्याप जाहीर झालेले नाहीत. त्यामुळे या अभ्यासक्रमांच्या पुढील वर्ग अद्याप सुरु झालेले नाहीत. परंतू जसजसे निकाल जाहीर होत आहेत. त्याप्रमाणात नियमित सलग प्रवेश निश्चित करण्याची प्रक्रिया सर्वच कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांकडून सुरु आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि. 1 JUL 2017
सकाळ



## संगणकशास्त्र अधिविभागातर्फे तांत्रिक प्रशिक्षण

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभाग व गुगल इंडियातर्फे ४ ते ८ जुलै दरम्यान 'ॲन्ड्रॉइड फंडामेंटल डेव्हलपमेंट' विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम होत आहे. संगणकशास्त्र अधिविभागात त्याचे आयोजन केले आहे. संगणकशास्त्र अधिविभाग व गुगल यांच्यात सामंजस्य करार करण्यात येणार आहे. फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचा हा दुसरा टप्पा आहे. त्यात विद्यापीठाच्या संलग्नीत महाविद्यालयातील प्राध्यापकांना गुगलच्या तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून तांत्रिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यांना गुगलतर्फे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JUL 2017
लोकमत

# पालकमंत्री आज जिल्हा दौऱ्यावर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राज्याचे महसूल व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील हे आज, शनिवारी जिल्हा दौऱ्यावर येत असून, यावेळी ते विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत.

सकाळी ७.२० वाजता त्यांचे रेल्वे स्थानक येथे आगमन होऊन वाहनाने निवासस्थानाकडे प्रयाण होणार आहे. सकाळी नऊ वाजता शिवाजी विद्यापीठ परिसरात चार कोटी वृक्षलागवड संकल्पपूर्ती अंतर्गत वृक्षलागवड अभियान प्रारंभ कार्यक्रमास ते उपस्थित राहणार आहेत.

यानंतर ११ वाजता ताराबाई पार्कातील रेसिडेन्सी क्लब येथे केंद्रीय वस्तू व सेवा कर (जी.एस.टी.) प्रारंभ कार्यक्रमास उपस्थिती. ११.२५ वाजता कसबा बावडा येथील दि कोल्हापूर डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., कोल्हापूर या संस्थेच्या स्वमालकीच्या नूतन इमारतीच्या उद्घाटन समारंभास उपस्थिती. दुपारी १२.३० वाजता केशवराव भोसले नाट्यगृह येथे पोलीस पाटील सन २०१७ च्या प्रशिक्षण कार्यक्रमास सदिच्छा भेट.

चार वाजता भुयेवाडी (ता. करवीर) येथे वनविभागाच्या जागेत लोकसहभागातून जंगल पुनर्निर्माण मोहिमेअंतर्गत वृक्षलागवड प्रारंभ कार्यक्रमास उपस्थिती.

यानंतर रात्री ८.३० वाजता कोल्हापूर रेल्वे स्थानक येथून महालक्ष्मी एक्सप्रेसने मुंबईकडे प्रयाण, असा त्यांचा दौरा कार्यक्रम आहे.

1 JUL 2017 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्ह्यात आज 'शतकोटी' योजनेची सुरुवात

## पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत होणार प्रारंभ : ८ लाख ८८ हजार रोपे लावली जाणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शतकोटी योजनेंतर्गत राज्य सरकारने यावर्षी ४ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे. 'शतकोटी'अंतर्गत ९.४० लाख रोपांची आनॅलाईन नोद झाली आहे. शनिवारी ८ लाख ८८ हजार रोपे लावली जाणार आहेत. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सकाळी ९ वाजता शिवाजी विद्यापीठ परिसरात या मोहिमेला प्रारंभ होईल, अशी माहिती उपवनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ला यांनी शुक्रवारी दिली. रमण मळा येथील वन विभागाच्या कार्यालयात सायंकाळी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी योजनेचे नियोजन सांगितले.

ते म्हणाले, गतवर्षी शतकोटी वृक्षलागवड योजनेत जिल्ह्यासाठी ७ लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट होते. त्यापेक्षा अधिक वृक्षलागवड झाली होती. यावर्षी जिल्ह्यासाठी ९ लाखांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत ९ लाख ४० हजार इतकी रोपांची नोंद झाली आहे. वन विभागाकडून ८ लाख ८८ हजार रोप लागवडीसाठी खड्ड्यांची नोंद झाली आहे. त्यामुळे उद्दिष्टापेक्षा अधिक चांगली कामगिरी शतकोटी योजनेत यावर्षी होईल.

शुक्ला म्हणाले, १ जुलै रोजी दिवसभर लोकसहभाग आणि वन विभागाच्या माध्यमातून दुपारी ४ वाजता भुयेवाडी येथे पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते जंगल पुनर्निमाण अभियानाला प्रारंभ होणार आहे. जवाहर कारखाना परिसरात २४ हजार, कणेरी मठ येथे ३ हजार तर हिंडाल्को कंपनी ९ हजार झाडे लावणार आहे.

वनविभागाच्या ३४ रोपवाटिकांत २४ लाख १४ हजार आणि सामाजिक वनीकरण विभागाच्या ३३ रोपवाटिकांत १३ लाख ८५ हजार अशी ३८ लाख रोपे लागवडीसाठी तयार करण्यात आली आहेत. याशिवाय 'रोपे आपुल्या दारी' उपक्रमातून वन विभागाने कोल्हापूर, इचलकरंजी, गडहिंग्लज येथे प्रत्येकी ४ अशी १२ वनमहोत्सव केंद्रे उभारली आहेत. त्याद्वारे ४ हजार वृक्षप्रेमी आणि ६५ संस्थांनी ११ हजार रोपे विकत घेतली आहेत. त्याद्वारे ५७ हजार रुपयांचा महसूल जमा झाला आहे, अशी माहिती शुक्ला यांनी दिली.

### वनमहोत्सवात सवलतीच्या दरात रोपे उपलब्ध

कोल्हापूर जिल्ह्यात ५ जुलैपर्यंत वनमहोत्सव उपक्रम राबवला जाणार आहे. २५ जूनपासून जिल्ह्यात १२ ठिकाणी वनमहोत्सव केंद्रे सुरू केली आहेत. वन महोत्सवात २५ रोपे सवलतीच्या दरात दिली जाणार आहेत. शतकोटी योजनेत स्वयंसेवी संस्था, मंडळे, विविध शासकीय विभाग, शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती सहभागी होणार आहेत. याची तयारी पूर्ण झाल्याची माहिती उपवनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ला यांनी दिली.

1 JUL 2017 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वृक्षलागवडीसाठी ३७ लाख रोपे तयार

मटा ग्रीन कोल्हापूर



**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

वृक्षलागवड सप्ताहाअंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यात वृक्षलागवडीसाठी ३७ लाख रोपे तयार असून एक जुलै रोजी होणाऱ्या वृक्षलागवड कार्यक्रमाच्या निमित्ताने वनविभागातर्फे यावर्षीच्या चार कोटी वृक्षलागवड मोहिमेला प्रारंभ होणार आहे. वृक्षलागवड मोहिमेचा मुख्य कार्यक्रम पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी नऊ वाजता शिवाजी विद्यापीठ येथे तर दुपारी चार वाजता मौजे भुयाचीवाडी येथे होणार असल्याची माहिती कोल्हापूर वनविभागाचे उपवनसंरक्षक डॉ. प्रभु नाथ शुक्ल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. शुक्ल म्हणाले, 'लोकसहभागातून तसेच वनविभागाचे माध्यमातून पांरपरिक जंगली वृक्ष व जंगल पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत भुयाचीवाडी येथे एक हजार वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. यावर्षी कोल्हापूर जिल्ह्यामध्ये साडेआठ लाख रोपलागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. यानुसार साडेआठ लाख खड्डे खोदण्याचे काम पूर्ण झाले आहे. वनीकरण विभागाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत ऑनलाइन साडेनऊ लाख रोपांची नोंद करण्यात आली आहे. वनविभागांतर्गत ३४ रोपवाटिका केंद्रात २४ लाख तसेच सामाजिक वनीकरण विभागाने ३३ रोपवाटिका केंद्रातून १३ लाख अशी ३७ लाख रोपे लागवडीसाठी तयार केली आहेत.

**जिल्ह्यात वृक्षलागवड सप्ताहास आजपासून प्रारंभ**

सरकारतर्फे ना नफा ना तोटा धर्तीवर रोप आपल्या दारी हा उपक्रम राबवला असून यामध्ये कोल्हापूर वनविभागाने शहरात चार, इचलकरंजी येथे चार तर गडहिंग्लज येथे १२ वनमहोत्सव केंद्रांची उभारणी केली आहे. या केंद्रातून आजपर्यंत ३८६२ व्यक्तींनी तर ६५ संस्थांनी साडेदहा हजार रोपे विकत घेतली असून याद्वारे ५७ हजार ६०२ रुपयांचा महसूल संकलित झाला आहे. ५ जुलै अखेर वनमहोत्सव केंद्र सुरू राहणार आहेत, अशी ही माहिती डॉ. शुक्ल यांनी यावेळी दिली.

## अशी आहेत वनमहोत्सव केंद्रे

ताराबाई पार्क, रंकाळा तलाव, शिवाजी विद्यापीठ, बिंदू चौक, डी.के.टी. ई. कॉलेज इचलकरंजी, एस.टी.स्टँड इचलकरंजी, राणी बाग, इचलकरंजी, बस स्टँड गडहिंग्लज, मार्केटयार्ड, गडहिंग्लज, शिवराज कॉलेज, गडहिंग्लज, अयोध्या नगर, गडहिंग्लज येथे वनमहोत्सव केंद्र ५ जुलैपर्यंत सुरू राहणारआहे.

## ऑनलाइन नोंदणी

वनविभागाची ऑनलाइन रोप नोंदणी बंद करण्यात आली असली तरी ज्यांना रोप नोंदणी करायची आहे त्यांना www.mahaforest.nic.in या वेबसाइटवरील My plant mobile application द्वारे किंवा रोप आपल्या दारी या मोहिमेतंर्गत वनविभागाच्या वनमहोत्सव केंद्रात नोंदणी करता येणार आहे. तसेच १९६२ या क्रमांकावर फोन करूनही नोंदणी करण्याची सुविधा आहे.

-1 JUL 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हमखास उत्पन्न देणारी रेशीम शेती

**Raviraj.gaikwad**
@timesgroup.com
Tweet : @rg_ravirajMT





कोल्हापूर : शेतीतून शाश्वत उत्पन्न मिळवून देणारे क्षेत्र म्हणून रेशीम शेतीचा उल्लेख केला जातो. गेल्या दहा वर्षांत जिल्ह्यात रेशीम शेतीने मोठ्या प्रमाणावर बीज धारण केले आहे. दिवसेंदिवस या क्षेत्रात येणाऱ्या शेतकऱ्यांची संख्याही वाढत असून, जिल्ह्यातील पारंपरिक ऊस शेतीला ताकदीचा पर्याय म्हणून रेशीम शेतीकडे पाहिले जाऊ लागले आहे. तरीही शेजारच्या कर्नाटक राज्याच्या तुलनेत राज्यातील शेतकरी मागे असल्याचे दिसत आहे. सरकारने रेशीम शेतीला आणखी प्रोत्साहन देऊन क्षेत्र वाढविण्याकडे लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

**जिल्ह्यात वाढता कल; उसाला ताकदीचा पर्यायी विचार**

कोल्हापूर जिल्ह्यात १९८६ मध्ये आजरा तालुक्यातील धनगरमोळा आणि आंबोली येथे रेशीम प्रशिक्षण व पथदर्शन केंद्र सुरू झाले. केंद्रीय रेशीम मंडळाच्या म्हैसूर येथील संस्थेतून रेशीम आळ्यांचे आणि तुतीचे सुधारीत वाण आणले जात होते. जिल्ह्यातील रेशीम शेतीच्या विकासाने त्यानंतर अनेक चढ उतार पाहिले. पण, गेल्या दहा वर्षांत जिल्ह्यात रेशीम शेतीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्यातही पाच वर्षांत शिवाजी विद्यापीठाच्या प्राणी शास्त्र विभागातून करण्यात आलेल्या प्रयोगांमुळे रेशीम शेतीला चालना मिळू लागली आहे. सध्या कागल, गडहिंग्लज, हातकणंगले, चंदगड आणि आजरा या तालुक्यांत शेतकऱ्यांचा रेशीम शेतीकडे कल वाढला आहे. विशेष म्हणजे राज्यात लागणारी रेशीम अळ्यांची अंडी गडहिंग्लज येथील केंद्रात तयार होत असून, तेथून ती संपूर्ण महाराष्ट्रात पुरवली जात आहेत.

अतिशय कमी शिक्षण झालेला शेतकरी कोणत्याही वयात रेशीम शेतीला सुरुवात करू शकतो. कीड आणि रोग व्यवस्थापन, रेशीम अळी संगोपन, तुतीचे व्यवस्थापन, खत आणि सूक्ष्म अन्न द्रव्य नियोजन, एकात्मिक तंत्रज्ञान व्यवस्थापन यातून ही शेती करणे शक्य असल्याने, केवळ कौशल्य आधारीत क्षेत्र म्हणून याकडे पाहिले जाते. हे कौशल्य आत्मसात करण्यासाठी शिवाजी विद्यापीठातून मोठ्या प्रमाणावर सहाय्य केले जात आहे.

## कर्नाटक अग्रेसर

रेशीम शेतीमध्ये कर्नाटक राज्य देशात अग्रेसर बनत आहे. रेशीम शेती करणे हे तेथील सधन शेतकऱ्याचे लक्षण असून, त्याकडे शेतकऱ्यांचा ओढा दिवसेंदिवस वाढत आहे. तेथील ग्रामीण विकासत रेशीम शेतीचे योगदान खूम मोठे असल्याचे मानले जाते. सरकारकडूनही या तंत्रज्ञानावर आधारीत शेतीला प्रोत्साहन दिले जात आहे. त्यामुळे राज्यात कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेवर आले, तरी रेशीम खात्याचा प्रमुख मुख्यमंत्रीच असतो.

## शेतकऱ्यांसाठी अभ्यासक्रम

शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत आणि रेशीम शास्त्रज्ञ डॉ. ए. डी. जाधव यांच्या पुढाकाराने शेतकऱ्यांसाठी पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. रेशीम शास्त्र शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचा हा प्रयत्न असून, त्यासाठी शेतकऱ्यांना केवळ सातवी पास असण्याची अट आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमही सुरू करण्यात येत आहे.

**१०० टन**
जिल्ह्यातील रेशीम उत्पादन

**४ कोटी**
एकट्या यळगूड परिसरातील उलाढाल

**२८ हजार टन**
देशातील कच्चे रेशीम उत्पादन

**२**
भारताची रेशीम उत्पादनातील क्रमांक (पहिल्या क्रमांकावर चीन)

**दीड कोटी**
देशात निर्माण झालेला रोजगार

## रेशीम शेतीची वैशिष्ट्ये

- निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबित्व नाही
- संरक्षित छताखाली शेती होत असल्याने आपत्तीचा धोका नाही
- एक पिक वाया गेल्यास आठ दिवसांत पुन्हा नवी सुरुवात
- सुशिक्षित बेरोजगार अंतर्गत एकराला अडीच लाखांचे अनुदान
- तुतीची मोठ्या प्रमाणावर लागवड करून दुग्ध व्यवसायास मदत
- जनावारांना तुतीचा चारा देऊन सिल्क ॲन्ड मिल्क फॉर्म्युला शक्य

**रेशीम उद्योगातून एक एकर क्षेत्रात, ४०० टन उसातून मिळणाऱ्या उत्पन्नाएवढे पैसे मिळू शकते. जिल्ह्यातील ऊस शेतीला पर्यायी शेती म्हणून याचा विचार होत आहे. विद्यापीठाकडूनही संशोधन पातळीवर शेतकऱ्यांना थेट बांधावर जाऊन मार्गदर्शन केले जात आहे. शेतीमध्ये कायम चढ उतार असतात. पण, रेशीम शेती एवढे उत्पन्न मिळवून देणारे क्षेत्र दुसरे कोणतेही नाही.**

**- डॉ ए. डी. जाधव,**
प्राणीशास्त्र विभाग, कोल्हापूर

1 JUL 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शतकोटी वृक्ष लागवड मोहिमेचा आज प्रारंभ

## शिवाजी विद्यापीठात मुख्य कार्यक्रम : सप्ताहात साडेनऊ लाख रोप लावण्याचे उद्दिष्ट

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३० : शतकोटी वृक्ष लागवडीसाठी हजारो हात पुढे आले आहेत. उद्या शनिवार (ता. १) पासून सुरू होणाऱ्या वृक्ष लागवड मोहिमेत जिल्ह्यात साडेनऊ लाख वृक्षांची लागवड होणार आहे. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठात सकाळी ९ वाजता या मोहिमेचा प्रारंभ होणार आहे. विविध शासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालय तसेच संस्था, संघटनांच्या भक्कम प्रतिसादावर मोहीम यशस्वी करण्यासाठी वनविभाग व जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे.

शिवाजी विद्यापीठात वृक्ष लागवड मोहिमेचा मुख्य कार्यक्रम होईल. या उपक्रमात महापौर हसीना फरास, खासदार राजू शेट्टी, धनंजय महाडिक, संभाजीराजे छत्रपती, आमदार राजेश क्षीरसागर, सतेज पाटील, हसन मुश्रीफ, डॉ. सुजित मिणचेकर आदी सहभागी होतील.

या मोहिमेसाठी वन विभाग व जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. जिल्ह्यातील १ हजार २०० ग्रामपंचायतीच्या मदतीने प्रत्येकी दोनशे वृक्षाची लागवड होणार आहे. त्यासाठी जवळपास ८ लाख रोपे जिल्हाभर पोचवली आहेत. या शिवाय शहरात पाच ठिकाणी वनविभागाच्या स्टॉल्सवर रोपांची विक्री तेजीत सुरू आहे. वनविभागाने स्वतःच्या नर्सरीत ३२ लाख रोपे तयार केली आहेत. या मोहिमेत पुढील सात दिवसात जवळपास साडेनऊ लाख वृक्षांची लागवड होईल.

पान २ वर »

### व्यापक सहभाग



**वृक्ष लागवड मोहिमेत जिल्हाभरात जवळपास दीड लाख नागरिक तसेच २५ हजारांवर शासकीय व निमशासकीय कर्मचारी, तीन हजारांवर वनविभागाचे कर्मचारी, जवळपास १५०० हून अधिक संस्था, मंडळे यांचा सहभाग राहणार आहे.**

## लावलेल्या प्रत्येक वृक्षाची नोंद करा : डॉ. शुक्ला

कोल्हापूर, ता. ३० : शतकोटी वृक्षलागवड मोहिमेत प्रत्येक लागवड केलेल्या रोपाची नोंदणी होणे आवश्यक आहे. दुष्काळाचे चित्र कायमस्वरूपी बदलण्यासाठी एक लाख २५ हजार जंगली झाडांच्या रोपांची निर्मिती वन विभागातर्फे करण्यात येणार आहे. या वर्षाबरोबर पुढील वर्षीही त्या रोपांची लागवड केली जाईल. यातून भविष्यात घनदाट जंगली भाग विकसित होऊन पाऊसमान सुधारण्यास मदत होणार आहे. त्यासाठी यंदाच्या वृक्षलागवड अभियानात विविध संस्था, संघटनांच्या पातळीवर लागलेला हातभार मोलाचा ठरणार आहे, अशी माहिती उपवनसंरक्षक डॉ. प्रभुनाथ शुक्ला यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

यंदा झाड लावणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला माय प्लॉन्ट ॲपद्वारे आपण लावलेल्या झाडांची नोंद करता येईल. नाव, पत्ता, लावलेल्या झाडाचे नाव व ठिकाण

पान २ वर »

## लावलेल्या प्रत्येक वृक्षाची नोंद करा : डॉ. शुक्ला

» पान १ वरून

एवढीच माहिती त्यासाठी पुरेशी ठरणार आहे. याशिवाय वनमहोत्सव केंद्रस्थळावर अशीच माहिती नोंद करता येईल. त्यासाठी वनमहोत्सव केंद्रांचे पत्ते असे : वन विभाग ताराबाई पार्क, रंकाळा तलावजवळ, शिवाजी विद्यापीठ चौक, बिंदू चौक.

शासनाने 'ना नफा, ना तोटा' तत्त्वावर 'रोप आपल्या दारी' ही योजना राबविली असून, त्याला उदंड प्रतिसाद लाभला आहे. १२ वनमहोत्सव केंद्रातून अशी रोप विक्री झाली आहे. यात ३ हजार ८५२ व्यक्ती, ६५ संस्थांनी १० हजार ५०० रोपे विकत घेतली आहेत, असे डॉ. शुक्ला यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JUL 2017
लोकमत

# वासंती रासम यांचा उद्या 'सेवा गौरव'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागामधील प्रा. डॉ. वासंती रासम यांचा सेवागौरव समारंभ रविवारी (दि. २) सकाळी दहा वाजता विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे.

यावेळी प्रा. डी. यु. पवार यांच्या हस्ते डॉ. रासम यांचा सत्कार केला जाणार आहे. यावेळी प्रा. बी. बी. पाटील प्रमुख उपस्थित असतील. विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद व प्रा. रासम सेवागौरव सत्कार समितीने कार्यक्रम आयोजित केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
E 1 JUL 2017
लोकमत

# 'औद्योगिक सुरक्षा' बाबत विद्यापीठात मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात 'हॅझॉप' या औद्योगिक सुरक्षिततेच्या दृष्टीने उपयुक्त विषयावर कार्यशाळा झाली. यात ऑईल व गॅस फिल्डसाठीच्या ब्रिटिश कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक विश्वास शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

तंत्रज्ञान विभाग आणि ब्रिटिश कंपनी ईलेक्सिर कन्सल्टंट लिमिटेड यांच्यातील सामंजस्य करारांतर्गत ही कार्यशाळा घेण्यात आली. यात शिंदे यांनी आपला बोरिवडे ते ॲबर्दिन स्कॉटलंड (यू. के.) इथपर्यंतचा प्रवास वर्णन केला.

एखादा नवीन प्रकल्प ते उद्योग सुरु करण्याआधी घ्यावयाची खबरदारी, त्यासाठीची तयारी आणि संबंधित प्रकल्प सुरु केल्यानंतर पूर्णत्वाला नेण्यासाठीचे तंत्र, आदींबाबत मार्गदर्शन केले. मनुष्य, वित्त व यंत्रसामग्री हानी टाळण्यासाठी उपलब्ध विविध सयंत्रे व उपाय याबद्दल सहभागी विद्यार्थ्यांना त्यांनी माहिती दिली.

या कार्यशाळेत तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी स्वागत केले. समन्वयक डॉ. पी. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JUL 2017
तरुण भारत

# विद्यापीठात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ संगणकशास्त्र अधिविभाग आणि गुगल इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ते ८ जुलैदरम्यान 'एन्ड्रॉइड फंडामेन्टल डेव्हलपमेंट' या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोगॅमचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभागात हा कार्यक्रम होईल. संगणकशास्त्र अधिविभाग व गुगल यांच्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सामंजस्य करार करण्यात येणार आहे. २ ते ६ जानेवारीदरम्यान अशा प्रकारच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे अधिविभागाच्यावतीने गुगलच्या सहकार्याने आयोजन करण्यात आले होते. ४ ते ८ जुलैदरम्यान फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचा दुसरा टप्पा आयोजित केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JUL 2017
Times of India




शिवाजी विद्यापीठ कला शाखेच्या गुणवत्ता यादीमध्ये दुसरा क्रमांक पटकाविल्याबद्दल धनश्री मेलशिंगरेचा सत्कार प्राचार्य डॉ. एन. व्ही.नलवडे यांनी केला.यावेळी प्रा. आर. बी. भास्कर, सी. आर. गोडसे आदी उपस्थित होते.

# विद्यापीठ गुणवत्ता यादीत धनश्री मेलशिंगरे दुसरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या न्यू कॉलेजमधील भूगोल विभागातील धनश्री दत्तात्रय मेलशिंगरे हिने शिवाजी विद्यापीठ कला शाखेच्या गुणवत्ता यादीमध्ये ८४.८८ टक्के गुण मिळवून दुसरा क्रमांक पटकाविला. तिला चेअरमन डी. बी. पाटील यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य एन. व्ही. नलवडे हिच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य टी. के. सरगर, सी. आर. गोडसे, विभागप्रमुख प्रा. आर. बी. भास्कर, प्रा. व्ही. एस. पवार-पाटील, प्रा. एम. बी. हांडे, प्रा. आर. एस. पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JUL 2017
महाराष्ट्र टाईम्स

# हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक

कृषी क्षेत्रातील विविध प्रश्नांच्या अनुषंगाने विचारमंथन व्हावे यासाठी केंद्र सरकार दरवर्षी २३ डिसेंबर हा दिवस, चौधरी चरण सिंग यांचा जन्मदिवस 'किसान दिन' म्हणून साजरा करते. तसेच महाराष्ट्रात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीच्या निमित्ताने १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा होतो. शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी ज्यांनी उपाययोजना केल्या त्या महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे कृषीक्षेत्रातील योगदान विचारात घेणे, आवश्यक आहे.


वसंतराव नाईक

विदर्भातील पुसद तालुक्यातील गहुली या गावच्या वसंतराव नाईक यांनी १९६३ पासून १९७५ पर्यंत बारा वर्षे महाराष्ट्राचे नेतृत्व केले. शेतीमध्ये रमणारा, शेतीच्या प्रगतीचे स्वप्न पाहणारा, शेतीच्या समस्या सोडवण्यासाठी महत्व देणारा महानायक म्हणून त्यांना ओळखले जाते.

महाराष्ट्राच्या १९७२ च्या दुष्काळात वसंतराव नाईक यांनी केलेले कार्य हे कृषीक्षेत्राशी संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी केलेल्या उपाययोजनांचा विचार केल्यास, आजही हे विविध उपाय सुसंगत असून प्रत्यक्ष अंमलात आणले जात आहेत.

महाराष्ट्र हे राज्य अन्नधान्याच्या बाबतीत आघाडीवर असावे, स्वावलंबी असावे असे त्यांना वाटत असे. यासाठी त्यांनी संकरित ज्वारी बियाणांचा प्रचार केला. स्वतः गहुली येथे आपल्या शेतात संकरीत ज्वारीचे पीक घेतले व हायब्रीड बघण्यासाठी पत्रकारांना गहुली येथे येण्याचे आमंत्रण दिले. महाराष्ट्रात सतत पडणारा दुष्काळ निवारण करण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. महाराष्ट्रातील बहुसंख्य जिल्ह्यात मुख्यमंत्री म्हणून सतत दौरे केले, शेतक-यांच्या सभा घेतल्या.

महाराष्ट्राच्या १९७२ च्या दुष्काळात वसंतराव नाईक यांनी वि.स.पागे यांच्या प्रेरणेतून रोजगार हमी योजना सुरू केली. ही योजना सुरू झाल्यावर, स्त्री-पुरूष यांना समान वेतन देण्याचा निर्णय घेतला. कामाच्या ठिकाणी अर्धे वेतन व ज्वारी देणे हा निर्णय देखील अंमलात आणला. जमीन सुधारणा कायदा तसेच ठिबक सिंचनही संकल्पना वसंतराव नाईक यांनी आणली. या त्यांच्या कार्यामुळेच हरित क्रांतीचे प्रणेते म्हणून त्यांना ओळखले जाते. महाराष्ट्रात कमी पावसात लागणारे बी-बियाणे यावर संशोधन, मातीचा पोत, कापूस व फळ बागा संशोधन यासाठी कृषी विद्यापीठ व्हावे, यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. महाराष्ट्रातील पहिले कृषी विद्यापीठ १९६९ साली राहुरी येथे स्थापन करण्यात आले. त्यानंतर अकोला येथे डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ, परभणी येथे मराठवाडा कृषी विद्यापीठ, कोकणात दापोली कृषी विद्यापीठाची स्थापना वसंतराव नाईक यांनी केली. कापूस, गहू, तूर, भात, कडधान्ये, फळबागा यावरील संशोधन करण्यासाठी, कमी पावसात येणारी पिके यासाठी कृषी संशोधनाला चालना दिली. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने मराठवाडा कृषी विद्यापीठाला त्यांचे नाव देण्यात आले आहे.

महाराष्ट्राचा पुरोगामी चेहरा हा जसा महत्वाचा आहे, तसाच कृषीप्रधान राज्य म्हणून ओळख असणे हा आवश्यक आहे. यामुळे कृषी व कृषी समस्यांचे निवारण हा अग्रक्रमाचा विषय असणे आवश्यक आहे.

**-डॉ. निशा मुडे - पवार**
(लेखिका शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रमुख आहेत.)

1 JUL 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नोकरी बावीस वर्षांची ; रजा केवळ २५

## जनार्दन गवळी यांची कामावरील श्रद्धा : विद्यापीठात करतात पाणक्याचे काम

कोल्हापूर, ता. ३० : अधिकाऱ्याने रजा दिली नाही, की एखाद्या कर्मचाऱ्याचा चेहरा पडलेला. त्यात जर अधिकाऱ्यामागे 'लुडबूड' करणाऱ्या दुसऱ्या कर्मचाऱ्याला रजा मिळाली, की रजा न मिळालेल्या कर्मचाऱ्याचा नुसताच पारा चढलेला. कधीकधी एकाच दिवशी कर्मचाऱ्यांचे रजेचे अर्जच इतके, की रजा द्यायची कुणाला, या प्रश्नाने अधिकाऱ्याच्या कपाळावर आठ्या. असे सर्वसाधारण चित्र शासकीय अथवा खासगी कार्यालयात पहायला मिळत असले, तरी रजा कमीत कमी घेणारा एखादा कमर्चारी आढळला, तर भुवया उंचावल्याखेरीज राहणार नाहीत. बावीस वर्षांच्या कारकिर्दीत पंचवीस दिवसांहून कमी रजा घेणारे शिवाजी विद्यापीठातील कर्मचारी जनार्दन दत्तू गवळी चर्चेचा विषय ठरले आहेत.

श्री. गवळी हे सुभाषनगरात राहतात. विद्यापीठात ते १९८७ मध्ये पदार्थविज्ञान विभागात रोजंदारीवर रुजू झाले. चार वर्षांनंतर त्यांच्यावर पाणक्याची जबाबदारी सोपवण्यात आली. ते १९९७ ला सेवेत कायम झाले. तशी त्यांची कारकिर्द तीस वर्षांची झाली असली, तरी सेवेत कायम होऊन बावीस वर्षे झाली आहेत. विद्यापीठातील प्रत्येक अधिविभागात पाणीपुरवठा सुरळीत करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असल्याने त्यांच्या ड्युटीची वेळ पहाटे चार ते दुपारी बारा अशी आहे, मात्र, ड्युटीची वेळ संपल्यानंतरही पाण्याच्या कमतरतेमुळे विद्यापीठाकडे कोणी बोट दाखवू नये, या उद्देशाने ते विद्यापीठातच थांबत राहिले.

प्रयोगशाळेत मुबलक पाणी उपलब्ध झाले तरच विद्यार्थी 'प्रॅक्टिकल' पूर्ण करणार, याची जाणीव त्यांना होती. दीक्षांत सोहळा, सांस्कृतिक महोत्सव, राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय परिषद असो, पाणीपुरवठ्यात कमतरता पडणार नाही, याची ते दक्षता घेत राहिले. श्री. गवळी यांनी त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी घेतलेल्या कमी रजा कौतुकाचा विषय ठरला आहे. कामावर निष्ठा कशी असावी, याचा आदर्शच त्यांनी घालून दिला आहे. आज (ता. ३०) ते सेवानिवृत्त झाले आहेत. ते म्हणाले, "पाण्याची कमतरता विद्यापीठाला भासू नये, यासाठीच मी रजा घेण्याचे टाळले. पैशापेक्षा विद्यापीठाची सेवा मला महत्त्वाची वाटत राहिली."

### मुलाचा अपघाती मृत्यू

श्री. गवळी यांच्या मुलाचा २०१२ ला अपघाती मृत्यू झाला, मात्र त्याचे दुःख पचवत ते नातू महेंक व नात मुरमई यांचा सांभाळ करत आहेत. महेंक चौथीला, तर मुरमई पहिलीला आहे. श्री. गवळी यांच्या पत्नी गायत्री गवळी या विद्यापीठातील विद्यार्थिनी वसतिगृहात शिपाई म्हणून कार्यरत आहेत.





जनार्दन दत्तू गवळी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JUL 2017
पुण्यनगरी

## जीएसटीचा आंतरराष्ट्रीय अनुभव

जीएसटी स्वीकारलेल्या सर्वच देशांना या पद्धतीमुळे राष्ट्रीय उत्पन्न आणि रोजगारातील वाद या स्वरुपात फायदे झालेले दिसतात. या पद्धतीत फक्त एकदाच कर वसूल करणे अभिप्रेत असून जेव्हा विविध टप्प्यावर कर आकारणी होते, तेव्हा 'सेट ऑफ' पद्धती वापरुन कर परतावा दिला जातो. कॅनडाने याचा स्वीकार केल्यानंतर १.४ टक्के तेथे राष्ट्रीय उत्पन्न वाढले. भारतासही १ ते १.५ टक्के वाढ मिळू शकेल, असा अंदाज आहे. जीएसटीतून शेती व कामगार यांना अर्धा ते एक टक्का फायदा अपेक्षित आहे. जीएसटी स्वीकारण्यास विलंब केल्याने आपले दरवर्षी २५ हजार कोटींचे नुकसान होत होते. ते आता थांबेल व फायदा मिळणे सुरू होईल. अर्थात ज्या देशांनी जीएसटी दर किमान ठेवले, त्यांना जीएसटी सर्वाधिक फायद्याचे ठरले आहे. हे लक्षात घेऊन जेव्हा जीएसटीचे पुनर्विलोकन होईल, तेव्हा दर कमी करणे योग्य ठरेल. आपल्या शेजारील बांगलादेश १५ टक्के दर आकारतो.



डॉ. विजय ककडे
अर्थशास्त्र विभागप्रमुख